# द्वेषाधारित राष्ट्रवाद धोक्याचा

कोल्हापूर टाइम्स टीम

सध्याचा राष्ट्रवाद हा द्वेषाधारित असून त्याने आपला बुद्धीप्रामाण्यवाद आंधळा करून सोडला आहे, असे मत अमेरिकेतील हार्वर्ड केनेडी स्कूलमधील संशोधक डॉ. सूरज येंगडे यांनी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने आयोजित माणगाव परिषद शताब्दी वर्ष व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. 'राष्ट्रवाद आणि आंबेडकरवाद', असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

भारतीय राष्ट्रवादाचे अत्यंत वस्तुनिष्ठ विश्लेषण करताना डॉ. येंगडे म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटल्याप्रमाणे भारतीय समाज हजारो जातींत विभागला आहे. त्यात आणखी पोटजाती आहेत. प्रत्येक

## डॉ. सूरज येंगडे यांचे मत



जात स्वतंत्र राष्ट्र आहे आणि प्रत्येक नागरिक हा ज्याच्या त्याच्या जातीय-राष्ट्राशी प्रामाणिक आणि बांधील राहण्यासाठी प्रयत्नशील असतो. या प्रत्येक पोटजातीत जिचा तिचा राष्ट्रवाद आहे. ही बाब एखाद्या स्फोटकापेक्षा कमी नाही. म्हणून खऱ्या राष्ट्रवादाच्या प्रस्थापनेसाठी प्रथम जातीजातींमधील, पोटजातींमधील भेद संपूर्ण नष्ट करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे आपला राष्ट्रवाद हा परस्पर द्वेषाबरोबरच क्रिकेट-राष्ट्रवाद आहे. यामुळे खेळामध्ये अभिप्रेत असलेल्या खिलाडूवृत्तीला हरताळ फासला जातो आणि अखिलाडू राष्ट्रवाद हा खरा राष्ट्रवाद पुढे आणला जातो.'

डॉ. येंगडे म्हणाले, 'अंबानी, अदानी, मल्ल्या असले धनिक लोक आपल्या राष्ट्रवादाची भूमिका व दिशा ठरवितात. तो देशाचा राष्ट्रवाद म्हणून पुढे केला जातो. कष्टकरी, मजूर, महिला, शोषित, वंचित यांचा राष्ट्रवाद हा आपला कधीच होत नाही. त्याचबरोबर जुन्या काळात संस्कृतीच्या नावाखाली झालेल्या चुकीच्या, समाजविघातक गोष्टींचे पुनरुज्जीवन आणि त्यांची बहुजनांच्या पाठिंब्यावरच पुनर्प्रस्थापना करून सांस्कृतिक राष्ट्रवाद या गोंडस नावाखाली थोपविण्याची प्रक्रियाही सुरू आहे. राष्ट्रवादाचा पुरस्कारच करावयाचा असेल तर तो आर्थिक राष्ट्रवादाचा केला पाहिजे.''

कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तेजपाल मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले. सचिन देठे यांनी आभार मानले.

# द्वेषाधारित राष्ट्रवादामुळे बुद्धिप्रामाण्यवाद आंधळा

## डॉ. सूरज येंगडे : माणगाव परिषद शताब्दी वर्ष व्याख्यानमाला

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

सध्याचा आपला राष्ट्रवाद हा द्वेषाधारित असून त्याने आपला बुद्धिप्रामाण्यवाद आंधळा करून सोडला आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील हार्वर्ड केनेडी स्कूल येथील संशोधक डॉ. सूरज येंगडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित माणगाव परिषद शताब्दी वर्ष व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प गुंफताना 'राष्ट्रवाद आणि आंबेडकरवाद' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उद्‌घाटक म्हणून उपस्थित होते.




**कोल्हापूर : 'राष्ट्रवाद आणि आंबेडकरवाद' या विषयावर बोलताना डॉ. सूरज येंगडे. बाजूस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. श्रीकृष्ण महाजन.**

डॉ. येंगडे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे भारतीय समाज हा हजारो जाती-जातीत विभागला गेला आहे. त्याअंतर्गत आणखी पोटजाती आहेत. इथली प्रत्येक जात ही एक स्वतंत्र राष्ट्र आहे आणि इथला प्रत्येक नागरिक हा ज्याच्या-त्याच्या जातीय-राष्ट्राशी प्रामाणिक आहे. या प्रत्येक पोटजातीत जिचा-तिचा राष्ट्रवाद आहे. ही बाब एखाद्या स्फोटकापेक्षा कमी नाही. म्हणून खऱ्या राष्ट्रवादाच्या प्रस्थापनेसाठी प्रथमतः हा जाती-जातींमधील, पोटजातींमधील भेद नष्ट करण्याची गरज आहे. धनिक लोक आपल्या राष्ट्रवादाची भूमिका व दिशा ठरवितात. तो देशाचा राष्ट्रवाद म्हणून पुढे केला जातो.

अध्यक्षीय भाषणात डॉ. महाजन म्हणाले, भारतीय म्हणून आपली ओळख देत असताना आपण स्वतःच्या इतर ओळखी मात्र सोडल्या नाहीत, ही फार मोठी चूक आहे. सुरुवातीला कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. तेजपाल मोहरेकर यांनी स्वागत, प्रास्ताविक

पुढारी

# सध्याचा आपला राष्ट्रवाद द्वेषाधारित : डॉ. येंगडे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



सध्याचा आपला राष्ट्रवाद हा द्वेषाधारित असून त्यामुळे आपला बुद्धिप्रामाण्यवाद आंधळा करून सोडला असल्याचे स्पष्ट मत अमेरिकेतील हार्वर्ड केनेडी स्कूल येथील संशोधक डॉ. सूरज येंगडे यांनी बुधवारी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित माणगाव परिषद शताब्दी वर्ष व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प गुंफताना 'राष्ट्रवाद आणि आंबेडकरवाद' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उद्घाटक म्हणून उपस्थित होते.

डॉ. येंगडे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे भारतीय समाज हजारो जातीजातींत विभागला गेला आहे. त्या अंतर्गत आणखी पोटजाती आहेत. इथली प्रत्येक जात हे एक स्वतंत्र राष्ट्र आहे आणि इथला प्रत्येक नागरिक हा ज्याच्या त्याच्या जातीय - राष्ट्राशी प्रामाणिक आणि बांधील राहण्यासाठी प्रयत्नशील असतो. या प्रत्येक पोटजातीत जिचा तिचा राष्ट्रवाद आहे. ही बाब एखाद्या स्फोटकापेक्षा कमी नाही. म्हणून खऱ्या राष्ट्रवादाच्या प्रस्थापनेसाठी प्रथमतः हा जातीजातींमधील, पोटजातींमधील भेद संपूर्णतः नष्ट करण्याची गरज आहे.

जुन्या काळात संस्कृतीच्या नावाखाली झालेल्या चुकीच्या, समाजविघातक गोष्टींचे नव्याने पुनरुज्जीवन करून ते राष्ट्रवादाच्या गोंडस नावाखाली थोपविण्याची प्रक्रिया सुरू आहे. राष्ट्रवादाचा पुरस्कारच करावयाचा असेल तर तो आर्थिक राष्ट्रवादाचा केला पाहिजे, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

डॉ. महाजन म्हणाले, आपण भारतीय म्हणून ओळख देत असताना स्वतःच्या इतर ओळखी आपण सोडल्या नाहीत हे चुकीचे आहे. तेजपाल मोहरेकर यांनी स्वागत, सचिन देठे यांनी आभार मानले. यावेळी शिक्षक, अभ्यासक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.